पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसूचना/ ११० /२०२३ दि. ०८/०८/२०२३

## —:वाहतूक नियंत्रण अधिसुचना:—

**संदर्भ** :— 1) MSRDC/02/JMD(ENGG-1)/BKSP/Six Lanning/Palawa junction/F.No.204/4831. Date -02/08/2023.
2) कोळसेवाडी वाहतूक उपविभागाचे जा.क्र. ७१३/२०२३, दि. ०४/०८/२०२३.

*******

**ज्याअर्थी,** ठाणे वाहतूक विभागाच्या कार्यक्षेत्रातील कोळसेवाडी वाहतूक उपविभागाचे हद्दीमध्ये महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई अंतर्गत लोढा पलावा जंक्शन येथील देसाई खाडी ब्रिज ते काटई गाव येथे नवीन पूल निर्माण करण्याचे काम चालू असून नवीन पुलाचे काम सुरू आहे. एक्सपेरिया मॉल समोरील लोढा कॉम्प्लेक्सचे आतमध्ये जाणाचे मुख्य प्रवेशद्वारावर कल्याण फाटा कडून कल्याणकडे जाणाऱ्या वाहिनीवर मोठे क्रेनचे सहाय्याने सिमेंट गर्डर ठेवण्याचे काम करावयाचे आहे. त्याकरीता दि. ०९/०८/२०२३ ते दि. १४/०८/२०२३ रोजीपावेतो रात्रौ २२:०० ते सकाळी ०६:०० वाजेपावेतो सदर पूलावरील वाहिनी वाहतूकीकरीता बंद करण्यात येणार असल्याने, सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे :—

**प्रवेश बंद** :— १) मुंब्रा, कल्याण फाटा कडून कल्याण कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड–अवजड वाहनांना कल्याण फाटा येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** :— सदरची वाहने कल्याण फाटा–मुंब्रा बायपास–खारेगाव टोलनाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद** :— २) कल्याण कडून कल्याण फाटा कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड–अवजड वाहनांना बदलापूर चौक येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** :— सदरची वाहने बदलापूर चौक–खोणी नाका–तळोजा एमआयडीसी मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतूक अधिसूचना खालील नमूद कालावधी दरम्यान गर्डर टाकण्याचे काम पूर्ण होई पर्यंत अमलात राहील.
१) दि. ०९/०८/२०२३ रोजी रात्रौ २२.०० वा. ते दि. १०/०८/२०२३ रोजी सकाळी ०६.०० वाजे पर्यंत
२) दि. १०/०८/२०२३ रोजी रात्रौ २२.०० वा. ते दि. ११/०८/२०२३ रोजी सकाळी ०६.०० वाजे पर्यंत
३) दि. ११/०८/२०२३ रोजी रात्रौ २२.०० वा. ते दि. १२/०८/२०२३ रोजी सकाळी ०६.०० वाजे पर्यंत
४) दि. १२/०८/२०२३ रोजी रात्रौ २२.०० वा. ते दि. १३/०८/२०२३ रोजी सकाळी ०६.०० वाजे पर्यंत
५) दि. १३/०८/२०२३ रोजी रात्रौ २२.०० वा. ते दि. १४/०८/२०२३ रोजी सकाळी ०६.०० वाजे पर्यंत
६) दि. १४/०८/२०२३ रोजी रात्रौ २२.०० वा. ते दि. १५/०८/२०२३ रोजी सकाळी ०६.०० वाजे पर्यंत

सदरची वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

– मा. अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) महाराष्ट्र राज्य, मुंबई.

– मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
– मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर.
– मा. जिल्हाधिकारी, ठाणे
– मा. आयुक्त, ठाणे, भिवंडी, कल्याण–डोंबिवली, उल्हासनगर, नवी मुंबई महानगरपालिका.
– मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
– मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
– मुख्य अभियता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई.
– प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे/कल्याण
– पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण.
– पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे.
– पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
– परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.
– विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण,
– नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर.
– ठाणे पोलीस पत्रक

<u>प्रत</u> :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर.

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

<u>प्रत</u> :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

<u>प्रत</u> :– सहायक पोलीस आयुक्त, ठाणे/कल्याण/उल्हासनगर वाहतूक विभाग.
पोनि कळवा, मुंब्रा, कोळशेवाडी, कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर, अंबरनाथ, वाहतूक उपविभाग.

२/– म.न.पा. कल्याण–डोंबिवली च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावीत.